महाराष्ट्र शासन

दूर.२२८१९५१७

क्रमांक : संकीर्ण २०१२/प्र.क्र.१६२/ तां.क.-२,
पर्यावरण विभाग, मंत्रालय, १५ वा मजला,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- १० सप्टेंबर, २०१२

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(रत्नागिरी व सिंधुदुर्ग वगळून)

विषय : मा. सर्वोच्च न्यायालयाने I.A.No.12-13 of 2011 in SLP(C) No.19628-19629 of 2009 या प्रकरणात दि.२७.२.२०१२ रोजी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.

महोदय,

आपणास माहित आहेच की, मा. सर्वोच्च न्यायालयाने दीपककुमार विरुध्द हरयाणा शासन यांच्याशी संबंधित SLP(C) No.19628-19629 of 2009 या प्रकरणात दि.२७.२.२०१२ रोजी दिलेल्या निकालानुसार राज्य शासनांनी गौण खनिजांकरिता ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी नवीन खनिपट्टा / सध्या कार्यान्वित असलेल्या खनिपट्ट्यांचे नुतनीकरण मंजूर करण्यापूर्वी पर्यावरण व वन मंत्रालयाची परवानगी घेणे आवश्यक आहे. सदर निकालाच्या अनुषंगाने केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाने दि. १८.०५.२०१२ च्या पत्रान्वये (प्रत सोबत) असे कळविले आहे की, यापुढे गौण खनिजांसाठी प्रस्तावित केलेल्या खनिपट्ट्यांचे क्षेत्रफळ कितीही असले तरी अशा नवीन खनिपट्ट्यांना किंवा विद्यमान खनिपट्ट्यांचे नुतनीकरण करण्यापूर्वी EIA 2006 च्या अधिसूचनेमधील तरतुदींनुसार संबंधित राज्यस्तरीय पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरणाची (SEIAA) पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या खनिपट्ट्यांचे प्रकल्प आणि ५ ते ५० हेक्टरपर्यंत क्षेत्रफळ असलेले खनिपट्ट्यांचे प्रकल्प हे EIA २००६ मधील तरतुदींनुसार B प्रवर्गातील असल्याचे गृहित धरून त्याप्रमाणे संबंधित प्राधिकरणांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२. केंद्र शासनाच्या दि.१८.०५.२०१२ च्या आदेशानुसार आता ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रफळाच्या खनिपट्ट्यासाठीही पर्यावरण विषयक पूर्व अनुमती घेण्याचे बंधनकारक केले

असल्यामुळे त्याबाबत काही जिल्हाधिकारी/प्रकल्प प्रवर्तक यांचेकडून प्राप्त झालेले काही प्रस्ताव राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन समिती (SEAC) या समितीच्या ५८ व्या बैठकीत ठेवण्यात आले होते. त्याबाबत SEAC ने केलेली शिफारस पुढीलप्रमाणे आहे :-

1 The information furnished in Form-1 shall be duly certified by the District Collector or the Competent authority nominated by the District Collector. Information in Form-1 shall have all details listed above.

2 The applications shall be channellised through the Collector/ Mining Officer with NOC.

3 Environmental impacts due to existing activities and proposed activities shall be incorporated into the combined proposal.

4 Information regarding any illegal mining and abandoned mining shall also be provided to Environment Department as they very much impact the environment.

5 The application shall contain pre-feasibility report, large site plan, layout plan, lease deed,project cost,available reserves,ecology of the region,details of minerals extracted,impact on environment,mitigation management plan, prefeasibility report along with the statutory clearance from concerned authorities

6 However, each case will be taken up for appraisal separately.

३. दिनांक २७ व २८/८/२०१२ रोजीच्या ५० व्या बैठकीत SEIAA ने उपरोक्त शिफारशींना सहमती दर्शवितांना असे सुचित केले आहे की, मा.सर्वोच्च न्यायालयाने संबंधित अर्ज निकाली काढण्यासाठी घालून दिलेली कालमर्यादा तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडील कामाचा भार लक्षात घेता त्यांच्या अखत्यारीत असणाऱ्या जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी संबंधित सर्व अर्ज प्रमाणित करुन ते आवश्यक त्या माहिती/कागदपत्रांसह SEAC कडे सादर करावेत. SEAC व SEIAA च्या अनुक्रमे ५८ व्या व ५० व्या बैठकांचे इतिवृत्त या विभागाच्या *ec.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे

४. या संदर्भात आपणास असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, SEIAA च्या निर्णयानुसार गौण खनिजांसाठी ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रफळाकरिता नवीन खाणपट्टा / सध्या कार्यान्वित असलेल्या खाणपट्ट्यांचे नुतनीकरण इत्यादींसाठी पर्यावरण विषयक पूर्व अनुमती प्राप्त करण्याकरिता संबंधित सर्व प्रकल्प प्रवर्तकांनी विहित नमुन्यातील अर्ज (EIA Notification 2006 मधील Form-1, Pre feasibility Report) आवश्यक त्या सर्व माहिती आणि कागदपत्रांसह (SEAC ने उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतच्या माहितीसह) जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांकडे सादर

करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची परि.२ मध्ये नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने (आवश्यकतेनुसार Accredited Environment Consultant ची मदत घेऊन)काटेकोर छाननी पूर्ण करुन सुस्पष्ट शिफारशीसह व ना हरकत प्रमाणपत्रांसह एकत्रित प्रस्ताव राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन समिती (SEAC-१)समोर विचारार्थ सादर करण्याकरिता या विभागाच्या SEAC कक्षाकडे पाठविण्याबाबत जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांना (रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे वगळून) आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

१५. आपणास असेही कळविण्याचे मला निदेश आहेत की, SEAC कक्षाकडे पाठविण्यात येणारे एकत्रित प्रस्ताव SEAC-१ च्या ज्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात येतील त्या बैठकीस Accredited Environment Consultant व संबंधित प्रकल्प प्रवर्तकांसह स्वतः उपस्थित राहण्याबाबत सर्व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात.

६. केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दि. १८.०५.२०१२ च्या आदेशांच्या अनुषंगाने या विभागाने निर्गमित केलेल्या क्रमांक गौखानि २०१२/प्र.क्र.१०१/का.३, दिनांक २५.०५.२०१२ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार ज्या प्रकल्प प्रवर्तकांनी SEAC कक्षाकडे वैयक्तिक प्रस्ताव सादर केले आहेत त्या प्रकल्प प्रवर्तकांनी वरील प्रमाणे जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक असल्याने तशा आशयाच्या सूचना आपल्या स्तरावरुन सर्व खनिपट्टा धारकांना देण्यात याव्यात अशीही विनंती आहे. रत्नागिरी व व सिंधुदुर्ग जिल्ह्यात सध्या अधिस्थगन ( Moratorium ) लागू असल्यामुळे त्या जिल्ह्यांना प्रस्तुत कार्यवाहीमधून Moratorium च्या मुदतीपर्यंत वगळण्यात आले आहे.

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी)

( र. ल. लखोटे )
कक्ष अधिकारी

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-
१) उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२) उप सचिव (खनिकर्म), उ.,ऊ.व का. विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३) सर्व जिल्हा खनिकर्म अधिकारी (रत्नागिरी व सिंधुदुर्ग वगळून)

Lakhote-draft.new 1.3